# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 16/01/2021 (शनिवार)
(सकाळ)

---

### रेती चोरी करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 10 किमी अंतरावर मौजा टाकळी येथे दिनांक 15/01/2021 चे 18.00 वा. दरम्यान एमच–40/सीए–0268 क्रमांकाचा ट्रैक्टरचा चालक आरोपी नामे– धमेन्द्र परसराम ठाकरे, वय 26 वर्ष, रा. एसओ वार्ड क्र. 8, चंगेरा बेनी बालाघाट मध्यप्रदेश ह. मु. वार्ड क्र. 17 कुही याने त्याच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 1 ब्रास रेती किं. 8,000/– रू. भरून वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण 8,08,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस शिपाई अमित पवार यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री भारत थिटे 9623857068 हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. खापरखेडा – दिनांक 15/01/21 चे 19.30 वा. ते 20.00 वा. चे सुमारास पो.स्टे. खापरखेडा हद्दीत फिर्यादी यांची 14 वर्षीय अल्पवयीन मुलगा नामे– सौरभ शेन्डे, वय 14 वर्ष, बोरगाव हा आजीचे रागावरून रागाचे भरात काही न सांगता सोबत 5,000/–रू. घेवून घरून निघुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री शेवाळे 9421320411 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर